वर्ष-०७ | अंक-०८ | मुंबई, मंगळवार १२ ते १८ जानेवारी २०२१ | पृष्ठ-४

मूल्य २/- रुपये

R.N.I. No. MAHMAR/2014/60133

POSTAL REGISTRATION NO. PLG/205/2019-2021

# पोलीस बातमी पत्र

पोलीस बातमी पत्र

•संपादक : दिपक मोरेश्वर नाईक •कार्यकारी संपादक : गुरु प्रसाद नाईक • सह संपादक : सौ. डॉ. अश्विनी नाईक

www.policebatmipatra.com / policebatmipatra.in policebatmipatra@gmail.com FOLLOW US! https://policebatmipatra.page

PG 2 बारावीच्या शेकडो विद्यार्थ्यांवर आयत्यावेळी विषय बदलण्याची वेळ

3 → मराठी मातेला श्रीमंत मावशीचा रुबाब मिळू द्या की!

शरीरास प्राणघातक अशा अंमलीपदार्थांचे सेवन करणाऱ्या 4 सराईतांना... ← 4

## मुंबई आणि ठाण्यात पोहोचला बर्ड फ्लू!



मुंबई, महाराष्ट्रात परभणीमध्ये बर्ड फ्लूने शिरकाव केल्याची माहिती समोर आली आहे. त्यानंतर आता राज्याची राजधानी मुंबईतही बर्ड फ्लूने एंट्री केली आहे. मुंबई आणि ठाण्यात (Thane) मृत पावलेल्या पक्षांचे ...पान २ वर...

## ठाण्यात सिलिंडरचा स्फोट; सात जखमी



ठाणे : वागळे इस्टेटमधील रामनगर भागात शनिवारी रात्री एका दुकानाला लागलेली भीषण आग विझविताना सिलिंडरचा स्फोट झाला. या घटनेत सातजण ...पान २ वर...

# कोस्टल रोडसाठी मावळा खोदणार बोगदा; मुख्यमंत्र्यांच्या हस्ते नव्या यंत्राचे उद्घाटन

मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांची महत्वाकांक्षी योजना असलेल्या कोस्टल रोडच्या कामामधील एका महत्वाच्या टप्प्याच्या कामाला आज सुरुवात झाली. कोस्टल रोडसाठी बोगदा खोदणाऱ्या मशिनचे आज मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्या हस्ते उद्घाटन झाले. या मशिनचे 'मावळा' असे वैशिष्ट्यपूर्ण नाव ठेवण्यात आले आहे. या मावळाच्या उद्घाटप्रसंगी मुख्यमंत्री ठाकरे म्हणाले, "मुंबईमध्ये दिवसेंदिवस वाहतूक कोंडी वाढत चाललेली आहे. उपनगरांतून शहरील दोन टोकांना सांधणारा 'कोस्टल रोड' हा महामार्ग आहे. हा कोस्टल रोड झाल्यानंतर शहरांमध्ये येणाऱ्या वाहतुकीला थोडासा दिलासा मिळेल. ज्यांना मध्य शहरात जाण्याची आवश्यकता आहे त्यांना थेट शहरात येण्याची सोय यामुळे होणार आहे. हा जो सागरी महामार्ग आहे त्यातील हा अत्यंत महत्वाचा टप्पा आहे त्याची सुरुवात आज झालेली आहे."

### कोस्टल रोडच्या महत्वाच्या टप्प्याचे काम सुरु



मुंबईच्या दृष्टीने आजचा हा समाधान देणारा आणि महत्त्वाचा क्षण आहे. २०१२ पूर्वीच आपण या समुद्री मार्गाची संकल्पना माडंली होती. वांद्रे-वरळी सी-लिंकलाच पुढे जोडणारा हा मार्ग असेल, अशी संकल्पना होती. मुंबईला सुंदर असा समुद्र किनारा लाभला आहे. समुद्राच्या या क्षितीजावर समुद्री मार्गही शोभून दिसणारा आहे. यासाठी आपण अप्रतिम असे नियोजन केले होते. कामही धुमधडाक्यात सुरु केले होते. मध्येच कोरोनाचे संकट आले, अजूनही ते गेलेले नाही. तरीही अनेक गोष्टी ठप्प झाल्या असतानाही, या कोस्टल रोडचे काम मंदावू दिलेले नाही. कोणतेही काम पुढे नेताना केवळ नेता असून भागत नाही, त्यासाठी लढवय्या मावळ्यांची गरज असते. तसे या कामामध्ये 'मावळा' या यंत्राचे काम असेल, असेही मुख्यमंत्री यावेळी म्हणाले.

उपनगरातील जनतेला थेट शहरात अधे-मधे न थांबता यायचे झाल्यास आता हा समुद्री मार्ग उपयुक्त ठरणार आहे. त्यांचा प्रवासही नयनरम्य होणार आहे. मुळात या समुद्री मार्गात भुयारी मार्गाच मोठ्या लांबीचा आहे. त्या कामाची आपण आज सुरवात करणार केली. हा भुयारी मार्ग थेट मलबार हिल खालून, गिरगाव चौपाटीवर निघणार आहे. हे काम लवकरावत लवकर म्हणजे नियोजित वेळेच्या आधीच पूर्ण होईल, असा विश्वास आहे. उपनगरांतून येणाऱ्या मुंबईकरांसाठी तो लवकरात लवकर वापरात येईल, अशी आशा आहे. मावळा मशीन नेमके काय आहे? बोगदा खणणारं मावळा मशीन (टीबीएमचा) हे या प्रकल्पातील महत्त्वाचं साधन आहे. या मशीन १२.१९ मीटर व्यासची आहे. हे भारतातील आतापर्यंतचा सर्वात मोठ्या व्यासाचा टीबीएम मशीन आहे. बोगद्याचा तयार केलेला व्यास ११ मीटर बोगद्यात सर्व सुरक्षेची व्यवस्था असेल. या टीबीएम मशीनला मावळा असं नाव देण्यात आलं आहे. अरबी समुद्राखालील तब्बल १७५ एकर जमिनीवर भराव टाकण्यात आला आहे. तर अजून १०२ एकर समुद्राखालील जमिनीवर भराव टाकण्यात येणार आहे. इतकंच नाही तर या मार्गावर समुद्राखालून ४०० मीटरचे बोगदे असतील. हे बोगदे खोदण्यासाठी मावळा हे मशीन आणलं आहे.

## 'ED समोरच जोड्याने मारलं नाही, तर माझं नाव संजय राऊत नाही!'



शिवसेना खासदार संजय राऊत यांच्याविरोधात भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या यांनी अनेक आरोप केले आहेत. त्यांच्या पत्नी वर्षा राऊत यांना आज ईडी कार्यालयाने पुन्हा समन्स बजावले. या पार्श्वभूमीवर संजय राऊत यांनी किरीट सोमय्या आणि भाजपला खडे बोल सुनावले आहेत. 'ज्या पद्धतीने किरीट सोमय्या अफाट, बेफाट, तोंडफाट पद्धतीने आरोप करत सुटले आहेत, त्यातून काहीही निष्पन्न होणार नाही. त्यांनी प्रताप सरनाईक, मुख्यमंत्री, माझ्या कुटुंबीयांविरोधात आरोप केले. त्यांनी हे आरोप सिद्ध करून दाखवावेत. पण ते सिद्ध केले नाहीत, तर ईडीच्या कार्यालयासमोर हे आरोप करणाऱ्यांना जोड्याने मारलं नाही, तर माझं नाव संजय राऊत नाही. तुमच्यासारख्या फडतूस लोकांनी असे आरोप करावेत आणि त्यातून पक्षानं प्रसिद्धी मिळवावी, असं राजकारण आम्ही कधी केलं नाही. पाहुयात, तुम्हीही आहात आणि आम्हीही आहोत', असं संजय राऊत म्हणाले आहे. एका खासगी ...पान २ वर...

## अवैधरित्या दारु विक्री होणाऱ्या ठिकाणी सातपाटी पोलीसांनी टाकला छापा; आरोपीला केले जेरबंद




पालघर येथे आरोपी नामे नरेंद्र ज्ञानेश्वर मोर (वय४५) राहायला वडराई नारळीबाव ता.जि. पालघर याने एकूण १३,१३० रुपये किमतीचा प्रोव्हिबिशन गुन्ह्याचा माल स्वतःच्या कब्जात बाळगून विक्री करत असल्याचे सातपाटी पोलीसांना मिळून आले. यावरून सातपाटी पोलिसांनी वडराई येथे छापा टाकला. सदरची घटना दिनांक. १०/०१/२०२१ रोजी ७:०० वाजताच्या सुमारास घडली. आरोपीच्या ...पान २ वर...

## पोलिसाला मारणाऱ्या दोघांना अटक



येरवडा, 'नो पार्किंग'मध्ये उभ्या केलेल्या वाहनांवर कारवाई करताना महिला वाहतूक पोलिस आणि वाहने उचलणाऱ्या कामगारांना शिवीगाळ करून मारहाण केल्याप्रकरणी विश्रांतवाडी पोलिसांनी दोन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले. कोर्टाने या दोन्ही अल्पवयीन मुलांची बाल सुधारगृहात रवानगी केली आहे. उर्वरित चार आरोपींचा अद्याप शोध लागलेला नाही. आरोपी तरुणांनी केलेल्या मारहाणीत संतोष रायकर आणि लखन शेंडगे जखमी झाले होते. या प्रकरणी येरवडा वाहतूक विभागाच्या पोलिस नाईक वंदना संजय आल्हाट (वय ४२) यांनी विश्रांतवाडी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली. पोलिसांनी ...पान २ वर...




## दहावीच्या परीक्षेचे अर्ज भरण्यास मुदतवाढ

***कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अर्ज भरण्यात येणारी अडचणी लक्षात घेता हे अर्ज भरण्यास २५ जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली असल्याचे राज्य मंडळातर्फे जाहीर करण्यात आले आहे.***

राज्य मंडळातर्फे घेण्यात येणाऱ्या दहावीच्या परीक्षेचे अर्ज भरण्यास २३ डिसेंबरपासून सुरूवात झाली. अर्ज भरण्याची अंतिम तारीख ११ जानेवारी होती. मात्र कोरोनाच्या पार्श्वभूमीवर अर्ज भरण्यात येणारी अडचणी लक्षात घेता हे अर्ज भरण्यास २५ जानेवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात ...पान २ वर...

## मोठ्याप्रमाणात तंबाखूजन्य पदार्थांची वाहतूक करणाऱ्या आरोपींवर तलासरी पोलीसांनी ठोकल्या बेड्या



पालघर येथील आर.टी.ओ. चेकपोस्ट दापचरी येथे दिनांक. ०९/१/२०२१ रोजी ०४:०० वाजताच्या दरम्यान चार इस्मान अवैधरित्या गुटख्याची वाहतूक करत असताना तलासरी पोलीसांना आढळून आले.आरोपी नामे १)शामशाद अहमद अब्दुल हनान (वय३७) राहायला वाटी, राज्य गुजरात २) राजू ३) इब्राहिम शेख ४) निपुल आरोपी शामशाद अब्दुल हनान याने त्याच्या मालकीची टाटा टेम्पो ह्या वाहनामध्ये आरोपी राजू, इब्राहिम शेख, निपुल ह्यांना घेऊन महाराष्ट्र शासनाने प्रतिबंधित केलेले तंबाखूजन्य अन्नपदार्थ त्यात विमल मसाला व्हि-१ तंबाखूचा माल वाहतूक करताना पोलीसांना आढळून आले.आरोपींच्या ताब्यातून तब्बल १)१,२०,००/- रुपये किंमतीचा महाराष्ट्रात बंदी असलेला विमल पान मसाला एकूण ०५ खाकी रंगाच्या गोण्या, एका गोणीमध्ये ४ सफेद रंगाच्या गोणी, एका सफेद रंगाच्या ...पान २ वर...

# बारावीच्या शेकडो विद्यार्थ्यांवर आयत्यावेळी विषय बदलण्याची वेळ



मुंबई : गेल्यावर्षी बदलण्यात आलेला नियम कनिष्ठ महाविद्यालयांनीही समजून घेतला नाही आणि राज्य मंडळानेही सर्व महाविद्यालयांपर्यंत बदललेले नियम पोहोचले आहेत का हे पाहण्याची तसदी घेतली नाही. मात्र, त्यामुळे आता बारावीच्या विद्यार्थ्यांसमोर पेच निर्माण झाला असून त्यांना परीक्षेच्या तोंडावर विषय बदलण्याची वेळ आली आहे.

शासनाने ८ ऑगस्ट २०१९ रोजी कनिष्ठ महाविद्यालयाच्या विषय रचनेत काही बदल केले. असलेल्या विषयांचे 'अ' , 'ब' आणि 'क' अशा तीन गटांत वर्गीकरण केले. त्यातील ब आणि क गटातील काहीच विषय घेता येतील असा निर्णय राज्यमंडळाने जाहीर केला. शिक्षणशास्त्र, सहकार, संरक्षण शास्त्र, इंग्रजी साहित्य, टंकलेखन व लघुलेखन असे काही विषय परीक्षेतून वगळण्यात आले.

गेल्यावर्षी जाहीर झालेल्या निर्णयाची काही शाळा, महाविद्यालयांना कल्पनाच नव्हती. राज्यमंडळानेही सर्व महाविद्यालयांपर्यंत माहिती पोहोचली आहे का याची खातरजमा केली नाही. त्यामुळे आता परीक्षेच्या तोंडावर शेकडो विद्यार्थ्यांसमोर पेच निर्माण झाला आहे. वगळलेले विषय परीक्षा अर्जात नसल्यामुळे आता अर्ज भरण्यात अडचणी येत आहेत.

दोन वर्षे शिकलेले विषय आता परीक्षेला न घेता दुसऱ्याच विषयांची तयारी करून विद्यार्थ्यांना परीक्षा द्यावी लागणार आहे.यंदा या विद्यार्थ्यांना परीक्षेला बसू द्यावे, अशी मागणी मुंबई कनिष्ठ महाविद्यालयीन शिक्षक संघटनेने केली आहे.

# भिमाशंकरमध्ये भाविकांची अंधश्रद्धा उठतेय वृक्षांच्या जिवावर!





लोक कितीही शिकले, मोठे झाले तरी अंधश्रद्धेवरचा पगडा काही हटत नाहीय. निसर्गाने दिलेल्या सुंदर नवसंपत्तीचा एकीकडे ऱ्हास होत चालला आहे. मोठ्या प्रमाणात वणवे लागणे, चोरून लाकूडतोड करणे, वृक्षतोड करणे, शहरीकरणासाठी जंगलांच्या ऱ्हास करणे यासारख्या घटना मोठ्या प्रमाणात होत आहेत. त्यातच आता वृक्षांवर अंधश्रद्धेचे घाव होताना दिसत आहेत. भीमाशंकर अभयारण्यातून एक धक्कादायक प्रकार समोर आला आहे.भीमाशंकरच्या जंगलातील नागफणी पॉइंट परिसरात शेकडो मोठ्या झाडांना असंख्य धातूचे शिक्के आणि नाणी ठोकल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या झाडांच्या दोन फाद्यांच्यामध्ये ठोकण्यात आलेल्या नाण्यांमुळे मोठी मोठी झाडे मृत्यूपंथाला लागली आहेत. अंधश्रद्धेच्या आहारी जाऊन झाडांना सुळावर चढवीत असल्याचे तिथल्या ग्रामस्थांचे मत आहे. मुरबाड सह्यगिरी एडव्हेंचर या संस्थेमार्फत काही गिर्यारोहक काही दिवसांपूर्वी भीमाशंकर जंगलात फिरण्यासाठी गेले असताना हि बाब त्यांच्या लक्षात आली. भीमाशंकर अभयारण्यात शेकरू म्हणजेच उडत्या खारी मोठ्या संख्येने आढळतात. माणसांच्या अशा बेशिस्त वागण्यामुळे इथल्या वन्यप्राण्यांना याचा धोका निर्माण झाला आहे.भीमाशंकर अभयारण्यात झाडांना ठोकण्यात आलेल्या नाण्यांमुळे तिथली सगळी झाडे ही विद्रुप दिसायला लागली आहेत. जंगलाच गुप्त धन किंवा मोक्षप्राप्तीसाठी असे प्रकार केले जात असल्याचा अंदाज आहे. काही झाडांच्या मुळांमध्ये नाणी ठोकली असल्याची माहिती गिर्यारोहकांनी दिली आहे. गेल्या काही वर्षांपासून जंगलामध्ये अशा प्रकारची अघोरी कृत्ये करण्याचे प्रमाण वाढले आहे. जंगल भागात नियमितपणे गस्त घालून त्याचप्रमाणे तिथल्या भागात लक्ष ठेवून नव विभागाने गैरप्रकार रोखायला हवेत, असे सह्याद्रीत भटकंती करणाऱ्या ज्येष्ठ गिर्यारोहकांचे मत आहे. गेल्या काही वर्षांत जंगलाच्या भागात भट्टी लावून गावठी दारू तयार करून जंगलाच्या चोरट्या मार्गाने ही दारू शहरी भागात विकण्याचे प्रमाणही मोठ्या प्रमाणात वाढले आहे. स्थानिक लोकांना रोजगार देण्याचे आमिष दाखवून हे उद्योग केले जातात. जंगलात होणारे हे प्रकार पर्यावरण आणि प्राण्यांसाठी हानिकारक आहेत.

# पालिकेकडून विद्यार्थ्यांसाठी 20 कोटींच्या मुखपट्ट्यांची खरेदी



मुंबई : मुंबई पालिकेने आपल्या शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी तब्बल २० कोटी रुपये खर्च करून ७५ लाख मुखपट्ट्या खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. करोनामुळे तूर्तास शाळा बंद आहेत. मात्र भविष्यात शाळा सुरू झाल्यानंतर विद्यार्थ्यांना संसर्ग होऊ नये यासाठी मुखपट्ट्या खरेदी केल्या जात असल्याचे अधिकाऱ्यांचे म्हणणे आहे. दरम्यान, प्रशासनाने दोन वर्षांसाठी मुखपट्ट्या खरेदीचा घाट घातल्याने नगरसेवकांकडून टीका होऊ लागली आहे.शाळा सुरू झाल्यानंतर विद्यार्थ्यांना सुरक्षिततेची बाब म्हणून मुखपट्टीचा वापर, सामाजिक अंतराच्या नियमाचे पालन आणि सॅनिटायझरचा वापर करावा लागणार आहे. ही बाब लक्षात घेत प्रशासनाने पालिका शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी तब्बल ७५ लाख मुखपट्ट्या खरेदी करण्याचा निर्णय घेतला आहे. प्रत्येक विद्यार्थ्याला २५ मुखपट्ट्या देण्यात येणार आहेत. पुढील दोन वर्षांसाठी मुखपट्ट्या खरेदी करण्यात येणार आहेत.एक मुखपट्टी धुऊन ३० दिवस वापरता येऊ शकते. त्यामुळे एका शैक्षणिक वर्षासाठी एका विद्यार्थ्याला १० मुखपट्ट्यांची गरज आहे. असे असतानाही २५ मुखपट्ट्या देण्यात येणार आहेत. यावरून नगरसेवकांनी प्रशासनावर टीका करण्यास सुरुवात केली आहे. सध्या निर्माण झालेल्या अर्थसंकटात गरजेपुरत्या मुखपट्ट्या खरेदी करण्याऐवजी त्या दामदुप्पट संख्येने घेण्यात येत आहेत. तूर्तास एका वर्षासाठी त्या खरेदी कराव्या. पुढच्या वर्षी गरजेनुसार खरेदी करावी, असे नगरसेवकांचे म्हणणे आहे.कंत्राटदाराच्या फायद्यासाठी?नगरसेवक निधीतून नागरिकांसाठी मुखपट्ट्यांची खरेदी करण्याची मागणी लोकप्रतिनिधींकडून होत होती. मात्र त्यास प्रशासनाने परवानगी नाकारली.

# खासगी रुग्णालयांतील अग्निसुरक्षेची तपासणी

मुंबई : भंडारा जिल्हा रुग्णालयातील अग्नितांडवानंतर खडबडून जागे झालेल्या मुंबई महापालिकेन तातडीने शहरातील खासगी रुग्णालयांतील अग्निसुरक्षा यंत्रणेची तपासणी करण्याचा निर्णय घेतला आहे. अग्निशमन दलामार्फत सोमवारपासून मुंबईतील खासगी रुग्णालयांच्या तपासणी सुरू करण्यात येत आहे. त्रुटी आढळणाऱ्या रुग्णालयांवर नोटीस बजावण्यात येणार आहे.भंडारा जिल्हा रुग्णालयात लागलेल्या आगीमध्ये १० बालकांचा मृत्यू झाल्याच्या घटनेची गंभीर दखल घेत मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी राज्यांतील रुग्णालयांमधील अग्निसुरक्षेची तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत.त्यानुसार मुंबई महापालिका प्रशासनाने शहरातील सर्व लहान-मोठ्या खासगी रुग्णालयांतील अग्निसुरक्षा यंत्रणेची तपासणी करण्याची मोहीम हाती घेण्याचे आदेश अग्निशमन दलाला दिले आहेत. खासगी रुग्णालयांमध्ये सोमवारपासून तपासणी सुरू होत असल्याचे पालिका अधिकाऱ्यांनी सांगितले.मुंबई महापालिकेच्या नायर, केईएम, शीव रुग्णालयांमध्ये नियमितपणे अग्निसुरक्षा तपासणी केली जाते. त्याचा अहवाल वेळोवेळी सादर केला जातो. मात्र पुन्हा एकदा पालिका रुग्णालयांतील अग्निसुरक्षेच्या तपासणीची उजळणी करण्यात येईल, असा दावा पालिका अधिकाऱ्यांनी दिली आहे.खासगी रुग्णालयांमधील अग्निसुरक्षा यंत्रणेत त्रुटी आढळल्यास तात्काळ व्यवस्थापनावर नोटीस बजावण्यात येणार आहे. यंत्रणेतील त्रुटी दूर करण्यासाठी व्यवस्थापनाला काही दिवसांची मुदत देण्यात येईल. मुदतीत त्रुटी दूर न केल्यास संबंधित रुग्णालयाविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे या अधिकाऱ्याने स्पष्ट केले.मुंबई महापालिकेने शहरातील पालिकेच्या आणि खासगी रुग्णालयांतील अग्निसुरक्षा यंत्रणेवर लक्ष केंद्रित केले आहे. पालिका रुग्णालयांची तपासणी नियमित करण्यात येते. त्यांची पुन्हा एकदा उजळणी केली जाईल. त्याचबरोबर सोमवारपासून खासगी रुग्णालयांतील अग्निसुरक्षा यंत्रणेची तपासणी मोहीम हाती घेण्यात येईल.

अग्निसुरक्षा यंत्रणेत त्रुटी आढळल्यास ती दूर करण्याची सूचना संबंधित रुग्णालयाच्या व्यवस्थापनाला करण्यात येईल.

# काय सांगताय? बायकोशी पटत नसेल तर नवऱ्याने दुसरीकडे रहावे



नवरा-बायकोमध्ये वाद होणे ही सामान्यबाब आहे. कारण संसार म्हटला का वाद हे होतातच. मात्र, बऱ्याचदा हे वाद टोकाला जातात आणि नवरा-बायको विभक्त राहू लागतात. मग पत्तीला कायद्यानुसार विभक्त राहू लागलेल्या पत्नीला घरभाडे द्यावे लागते. पण, घरभाडे देणे म्हणजे तिला न्याय मिळाला का?, असे म्हणता येणार नाही. संसार करताना जर बायकोशी पटत नसेल तर पतीनेही दुसरीकडे भाड्याच्या घरात राहायला काय हरकत आहे, असे महत्त्वपूर्ण मत दिंडोशीतील सत्र न्यायालयाने एका प्रकरणात नोंदवले आहे.सामाईक घरावर पती-पत्नी दोघांचाही हक्कएका ४५ वर्षीय महिलेने तिच्या पतीविरोधात कौटुंबिक छळाची तक्रार दाखल केली होती. यासाठी तिने दिंडोशी सत्र न्यायालयात दाद मागितली होती. त्यात तिने असे म्हटले होते की, 'पती मला घरात राहण्यास मनाई करत आहे. तसेच मला माझ्या मुलांना भेटण्यास देखील देत नाही. त्यामुळे मला पोटगी मंजूर करण्याबरोबरच घरामध्ये राहण्यास परवानगी द्यावी', अशी विनंती महिलेने केली होती. तिच्या याचिकेवर न्यायदंडाधिकाऱ्यांनी तिला दरमहा दोन हजारांची पोटगी आणि पाच हजारांचे घरभाडे मंजूर केले होते. मात्र, तिला समाईक घरामध्ये राहण्यास परवानगी नाकारली गेली.

# औरंगाबाद खंडपीठाचा महत्त्वपूर्ण निर्णय

## देवी-देवतांच्या, ग्रहांच्या नावाने यंत्र-तंत्र, खडे, मणी यांची विक्री करण्याची व प्रसार माध्यमांवर त्यांची जाहिरात दाखविण्यावर बंदी घालण्याचे आदेश

टी. व्ही. चॅनल्स आणि विविध प्रसार माध्यमांवर देवी-देवतांच्या नावाने यंत्र-तंत्र विक्री करण्यावर व जाहिरात दाखविण्यावर बंदी घालण्याचे आदेश मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाचे न्या. टी. व्ही. नलावडे व न्या. एम. जी. शेवलीकर यांनी मंगळवारी (५ जानेवारी) दिले. अशा प्रकारच्या यंत्राची विक्री, उत्पादन, प्रसार व प्रसार करणाऱ्यांवर अघोरी कृत्य आणि काळी जादू कायदा २०१३ (अघोरी प्रॅक्टिस अँड ब्लॅक मॅजिक अक्ट २०१३) नुसार गुन्हे दाखल करण्यात यावेत. केंद्र व राज्याने तीस दिवसांत अशा प्रकारांवर कारवाई करण्यासाठी काय पावले उचलली यासंबंधी औरंगाबाद खंडपीठाला अवगत करावे असेही आदेशात नमूद केले आहे. विविध प्रसारमाध्यमांतून धर्माच्या नावाने भीती दाखवून हनुमान चालिसा, देवीचे यंत्र, ताईत, खडे, मणी, आदी वस्तू विकण्याच्या जाहिराती मोठ्या प्रमाणावर दाखविल्या जात होत्या. सर्वसामान्य नागरिकांची अशा भोंदूगिरीच्या माध्यमातून लूट केली जाते. राज्यशासनाच्या २०१३ मधील अघोरी कृत्य व काळी जादू कायद्यानुसार या गोष्टींचे प्रसारमाध्यमांवर प्रक्षेपण करता येत नाही. याविरुद्ध २०१५ मध्ये औरंगाबाद येथील राजेंद्र गणपतराव अंभोरे (रा. टाऊनसेंटर, सिडको, औरंगाबाद) यांनी औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली होती. समाजात विज्ञाननिष्ठ नागरिक तयार होऊन वैज्ञानिक वातावरणास गती मिळावी, अंधश्रद्धेचे निर्मूलन व्हावे यासाठी संबंधित २०१३ चा कायदा निर्माण केला. प्रत्येक पोलिस ठाण्यात पोलिस निरीक्षकांच्या समवेत अशा बाबींवर प्रतिबंध घालण्यासाठी एक अधिकारी नियुक्त केलेला आहे.

## पृष्ठ १ वरुन

### मुंबई आणि ठाण्यात पोहोचला बर्ड फ्लू!

रिपोर्ट हे पॉझिटिव्ह आल्यामुळे खळबळ उडाली आहे. मुंबईत काही दिवसांपूर्वी दोन कावळ्यांचा मृत्यू झाला होता. या कावळ्यांचा स्वॅब घेऊन ते भोपाळ येथील राष्ट्रीय उच्च सुरक्षा पशूरोग संस्थेकडे पाठवण्यात आला होते. त्याचे अहवाल आज आले आहेत. यात दोन्ही कावळ्यांचा मृत्यू हा बर्ड फ्लूमुळे झाल्याचे निष्पन्न झाले आहे. तसंच 9 जानेवारी रोजी ठाण्यातील विजय गार्डन्स या सोसायटीत अनेक पक्षी मृतावस्थेत आढळून आल्यामुळे खळबळ उडाली होती. बगळा जातीतील हे पक्षी रस्त्यावर मृतावस्थेत पडून होते. स्थानिकांनी या घटनेबद्दल पक्षी प्रेमी, पर्यावरण प्रेमी यांना बोलावून माहिती दिली. त्यानंतर ठाणे पालिकेचे पशु वैद्यकीय अधिकारी आणि वन विभागाच्या अधिकाऱ्यांनी घटनास्थळी धाव घेतली. परिसराची पाहणी केल्यानंतर सर्व मृत पक्षांना अधिकाऱ्यांनी ताब्यात घेतले होते. त्यानंतर स्वॅब घेऊन ते भोपाळ इथं पाठवले होते. आज त्याचा अहवाल आला असून बर्ड फ्लूमुळेच त्यांचा मृत्यू झाल्याचे समोर आले आहे. यात 3 पाण बगळे आणि 1 पोपट बर्ड फ्लू पॉझिटिव्ह आढळून आला आहे. परभणीत बर्ड फ्लूमुळे 800 कोंबड्यांचा मृत्यू दरम्यान, परभणीतील मुरुंबा गावातील एका पोल्ट्री फॉर्ममध्ये 800 कोंबड्यांचा मृत्यू हा बर्ड फ्लूमुळे झाल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यानंतर आता प्रशासनाने खबदारी म्हणून पावलं उचलली आहे. बर्ड फ्लूचा फैलाव होऊ नये म्हणून मुरुंबा गावातील 10 हजार कोंबड्या आज संध्याकाळपर्यंत नष्ट करण्यात येणार आहे, अशी माहिती जिल्ह्याधिकाऱ्यांनी दिली. ज्या पोल्ट्री फॉर्ममध्ये कोंबड्यांचा मृत्यू झाला त्याच्या 1 किलोमीटर परिसरातील दहा हजार कोंबड्या नष्ट करण्यात येणार आहे. गाव आणि परिसर प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित तसंच, मुरुंबा येथे पोल्ट्री फार्ममध्ये मृत कोंबड्या आढळून आल्यानंतर खबरदारीचा उपाय म्हणून प्रशासनाने मुरुंबा गाव आणि परिसर प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित केले आहे. या ठिकाणी असलेल्या नागरिकांना, बाहेर पडण्यास मज्जाव करण्यात आला असून, नागरिकांनी काळजी घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी दीपक मुगळीकर यांनी केले आहे.

### ठाण्यात सिलिंडरचा स्फोट; सात जखमी

जखमी झाले असून त्यांची प्रकृती स्थिर आहे. जखमींमध्ये अग्निशमन दलाचे दोन जवान, शीघ्र प्रतिसाद वाहन चालक आणि चार स्थानिक नागरिकांचा समावेश आहे. एक ते दीड तासानंतर ही आग विझविण्यात अग्निशमन दलाला यश आले. ही आग नेमकी कशामुळे लागली, याचे कारण अद्याप समजू शकलेले नाही. अग्निशमन दलाचे जवान शरद गणपत कदम (५६), दीपेश पेटकर (२६), शीघ्र प्रतिसाद वाहनांचे चालक प्रसाद सुतार, स्थानिक नागरिक नितीन कदम (२०), केशव सकपाळ (५५), रोहन पांढरे (२१) आणि मंगेश कदम (४०) अशी जखमींची नावे आहेत. वागळे इस्टेट येथील रामनगरमधील रस्ता क्रमांक २८ जवळ मर्द मराठा वाहन स्पेअर पार्टचे दुकान आहे. तळ मजल्यावर हे दुकान आहे तर, वरच्या मजल्यावर एक कुटूंब राहत होते. त्या शेजारीच अजय अगावले आणि रामसिंग यादव यांचे तळ अधिक एक मजली घर आहे. शनिवारी रात्री ११ वाजता स्पेअर पार्टच्या दुकानाला आग लागली. दुकानामध्ये वाहनांना वापरण्यात येणारे तेल असल्यामुळे आगीने काही क्षणात पेट घेऊन रौद्ररूप धारण केले. दुकानाच्या वरच्या मजल्यावर आणि त्या शेजारी राहणाऱ्या नागरिकांनी घराबाहेर धाव घेतल्याने मोठा अनर्थ टळला. या घटनेची माहिती मिळताच ठाणे आपत्ती व्यवस्थापन विभाग आणि अग्निशमन दलाच्या जवानांनी घटनास्थळी धाव घेऊन आग विझविण्याचे काम सुरू केले. आगीवर नियंत्रण मिळविण्याचे काम सुरू असतानाच दुकानातील सिलिंडरचा स्फोट झाला. यामध्ये सातजण जखमी झाले. त्यांना परिसरातील रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून देण्यात आली.

### 'ED समोरच जोड्याने मारलं नाही,

वाहिनीला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी ही भूमिका मांडली.

औरंगाबादचं नामकरण झालं आहे! दरम्यान, यावेळी संजय राऊत यांनी सध्या सुरू असलेल्या औरंगाबाद शहराच्या नामांतरावर देखील भूमिका स्पष्ट केली. 'नामांतराची एक प्रक्रिया असते. त्यासाठी केंद्राकडे जावं लागलं. पण मुख्यमंत्री जेव्हा स्वत: एखाद्या शहराचं नाव संभाजी नगर असं घेतात, तेव्हा त्याचं नाव संभाजीनगर झालंय असं आम्ही जाहीर करतो', असं राऊत म्हणाले. या ब्लॅकमिलर्सच्या टोळयांचं काय? दरम्यान, यावेळी संजय राऊत यांनी भाजपवर तिखट शब्दांमध्ये टीका केली. 'तपास यंत्रणांनी जरूर तपास करावा. पण एखादा राजकीय पक्ष त्यांची वकिली करतो आणि जी गोष्ट ईडी, सीबीआयकडेही नाही, त्याबाबत बाहेर वक्तव्य केली जातात. भाजपच्या सगळ्याच नेत्यांबाबत या गोष्टी घडताना दिसत आहेत. त्यांच्याकडे पुरावे असतील, तर त्यांनी तसा तपास केलाच पाहिजे. पण या बाहेरच्या लोकांकडे येणाऱ्या माहितीवरून ते समाजातलं वातावरण खराब करण्याचा प्रयत्न करत आहेत. या ब्लॅकमिलर्सच्या टोळ्यांविरुद्ध कोणती भूमिका घेतली जाणार?' असं ते म्हणाले. कशासाठी सुरक्षेचे पिंजरे घेऊन फिरायचं? राज्यातील भाजपच्या काही नेत्यांची सुरक्षा काढण्यावरून त्यांनी यावेळी विरोधकांचे आरोप फेटाळून लावले. 'मला वाटत नाही सुरक्षा काढण्यात काही राजकारण झालं असावं. आमच्याही सुरक्षा याआधी काढण्यात आल्या आहेत. पण आम्ही कधी बोललो नाही. गेल्या वेळी आम्ही सरकारमध्ये होतो. तेव्हा माझीही सुरक्षा काढली गेली. महाराष्ट्राचं सरकार संवेदनशील आहे. विरोधकांच्या जीवाशी खेळण्याचा, विरोधकांशी सूडबुद्धीने वागावं असा राष्ट्रीय राजकारणातला ट्रेंड महाराष्ट्र सरकारची नाही. त्यामुळे विरोधकांची सुरक्षा काढण्यामागे राजकारण नाही', असं त्यांनी नमूद केलं. 'सुरक्षा काढण्याचा निर्णय झाला याअर्थी महाराष्ट्रातं वातावरण सुरक्षित आहे. शरद पवारांनीही सुरक्षा कमी करण्याची विनंती केली आहे. जर महाराष्ट्र सुरक्षित असेल, तर सुरक्षेचे पिंजरे कशासाठी घेऊन फिरायचे. दिल्लीमध्ये अनेक ठिकाणी सुरक्षेचा अतिरेक आहे. राजकारण्यांनी अधिक मोकळेपणाने फिरायला हवं', असंही ते म्हणाले.

### अवैधरित्या दारू विक्री होणाऱ्या

ताब्यातून तब्बल १) ६३००/- रुपये किंमतीचे ३५ लिटर क्षमतेचे तीन प्लास्टिकचे ड्रम त्यामध्ये एकूण १०५ लिटर गावठी हातभट्टीची दारू २) ४२००/- रुपये किमतीचे २० लिटर क्षमतेचे चार प्लास्टिकचे ड्रम त्यामध्ये एकूण ७० लिटर गावठी हातभट्टीची दारू ३) १२००/- रुपये किमतीचे १० लिटर क्षमतेचे दोन प्लास्टिकचे ड्रम त्यामध्ये एकूण २० लिटर गावठी हातभट्टीची दारू ४) ३६०/- रुपये किमतीचे ०२ लिटर क्षमतेच्या तीन प्लास्टिक बाटली त्यामध्ये एकूण ०६ गावठी हातभट्टीची दारू ५) ७०/- रुपये किमतीचे ०७ काचेचे ग्लास दारुचा उग्र वास येत असलेले. असे एकूण १२,१३०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

### पोलिसाला मारणाऱ्या दोघांना अटक

सहा अज्ञात तरुणांविरोधात सरकारी कामात अडथळा आणणे आणि जमाव जमवून मारहाण केल्याप्रकरणी गुन्हा दाखल केला होता. विश्रांतवाडी येथील एका मॉलसमोर बेकायदा पार्क केलेल्या गाड्यांवर महिला पोलिस कर्मचारी कारवाई करीत होत्या.

### मोठ्याप्रमाणात तंबाखूजन्य पदार्थांची

गोणी जांभळ्या रंगाचे ५०पॅकेट २)५,६१,००/- रुपये किंमतीचा महाराष्ट्रात बंदी असलेला विमल पान मसाला एकूण १५ खाकी रंगाच्या गोळ्या एका गोणी मध्ये ४ लहान गोण्या, एका लहान गोणीत लाल रंगाचे ५०पॅकेट, ३)६,५३,४००/- रुपये किमतीचा महाराष्ट्रात बंदी असलेला विमल पान मसाला एकूण १५ खाकी रंगाच्या गोण्या, ४)९९,०००/- रुपये किमतीचा महाराष्ट्रात बंदी असलेला व्हि-१ तंबाखू एकूण ३गोण्या, एका गोणीत ५ सफेद लहान गोण्या, ५)७२,६०० रुपये किमतीचा महाराष्ट्रात बंदी असलेला व्हि-१ तंबाखू एकूण १५ गोण्या, एका गोणीत १० लहान गोण्या, एका गोणीत २२ पॅकेट ६)३१,२००/- रुपये किमतीचा महाराष्ट्रात बंदी असलेला व्हि-१ तंबाखू एकूण ५ सफेद रंगाच्या लहान गोण्या, एका गोणीत ४ लहान गोणी, एका लहान गोणीमध्ये जांभळ्या रंगाचे २२ पॅकेट, एक पॅकेट ३० रुपये किमतीचे ७) १०,००,०००/- रुपये किमतीचा टाटा कंपनीचा टेम्पो असा एकूण २५,३७,४००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर आरोपींच्या विरुद्धात तलासरी पोलीस ठाणे गुन्हा रजि.क्र. ०६/२०२१ भा.द.वि.स.क. -३२८,१८८,२७२,२७३ सहा अन्नसुरक्षा मानदे कायदा २००६ नियम व नियमने कलम-२६(२),२७,२३,२६(२)(४),३०(२)(अ) प्रमाणे गुन्हा दाखल केला असून पुढील तपास चालू आहे. तसेच गुन्ह्यातील आरोपी शामशाद अब्दुल हनान याला दिनांक. ९/१/२०२१ रोजी ०८:०४ वाजता अटक करण्यात आली आहे. सदरची कामगिरी तलासरी पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी यांनी केली आहे.

## संपादकीय...

# मराठी मातेला श्रीमंत मावशीचा रुबाब मिळू द्या की!



पावसाळा संपला की, बेडकांच्या काही जाती 'हायबरनेशन'मध्ये जातात. म्हणजे मराठीत निष्क्रिय होतात. अखिल भारतीय वैगेरे मराठी साहित्य महामंडळाचे तसेच आहे. एक संमेलन संपल्यावर जी झोप घ्यायची, ते थेट पुढल्या संमेलनाच्या तुताऱ्या वाजवायलाच उठायचे. ठाले-पाटील बोलू लागले की समजावे, चला, आले पुन्हा अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन! या वर्षी कोरोनाने नसता गोंधळ घातला म्हणून, नाहीतर एव्हाना मांडव परतण्याचे मानापमान सोहोळे संपवून अ.भा. मराठी साहित्य महामंडळ पुन्हा एकवार शयनगृहात जाण्याची वेळ झालीच असती. तरीही उगीच अपवादाची तीट नको, म्हणून सलामीलाच किरकोळ वादाचा खेळ



उरकून या वर्षीच्या साहित्य संमेलनाच्या आयोजकपदाची माळ नाशिककरांच्या गळ्यात पडली आहे. हे उत्तम झाले. पुण्याने कितीही डोळे वटारले, तरी नाशिककरांच्या सांस्कृतिक उमदेपणाला तोड मिळणे तसे अवघडच. या शहराचा साहित्यिक इतिहास संपन्न, मनाची श्रीमंती मोठी आणि खिसाही खोल! उगीच कटोरे घेऊन सरकारच्या दारात जाण्याची गरजच पडू नये, अशी राजकीय पुण्याईही गाठीशी जोडलेली, शिवाय देश-परदेशातून कुठूनही नाशकात यावे म्हटले, तरी सोपे आणि नाशकात येण्याला नवी-जुनी नयनरम्य, चवीढवीची साहित्यबाह्य कारणेही तशी पुष्कळच! साहित्य संमेलन यशस्वी करायला आणखी काय लागते, तेव्हा तसे ते होईलच! या वर्षी अनेक अटी-शर्ती असतील, कोरोनाने घातलेली दृश्य-अदृश्य बंधने पाळावी लागतील. पण जे ठरवले, ते करून दाखविण्याची धमक नाशिककरांच्या ठायी असणार, हे निर्विवाद! पण मराठी साहित्य संमेलन म्हणून जे काय करायचे, ते नेमके काय आणि कसे असावे? याचा जरा मुळातून विचार करणे कधीपासून मागेच पडून गेले आहे; त्याची निदान सुरुवात तरी नाशिकने करायला हवी. गेल्या दीड दोन दशकांत जग किती बदलले, याचे वारे मराठी साहित्य क्षेत्राला कोणत्याच अर्थाने फारसे लागलेले नाही. साहित्याभिमानाच्या जुनाट प्रथा-परंपरांची बोटे सोडायची हिंमत नसलेले (मराठीत) लिहिणारे 'जुने'च राहून गेले आहेत आणि जगभराचा वारा प्यायची विपूल साधने उपलब्ध झालेले 'वाचणारे' मात्र नि:ष्कांचन मातृभाषेची चिंता करणे सोडून, श्रीमंत मावशांच्या सोबतीने जगभ्रमंतीला निघून गेले आहेत. हे वाक्य जरा झोंबणारे वाटत असल्यास, आपल्या मराठी साहित्य संमेलनांच्या गेल्या पाच-दहा वर्षांच्या कार्यक्रमपत्रिका काढून पाहाव्यात. तेच विषय, तेच वक्ते, तोच वकूब, तेच उमाळे, तीच रडगाणी आणि अख्ख्या मंडपभर पसरून राहिलेला असह्य कंटाळ्याचा तोच चिकट तवंग! हल्ली आडगावी जी साहित्य संमेलने झाली, तिथली गर्दी होती ती मुख्यत: मंडपाच्या बाहेर. पुस्तक प्रदर्शनात, खाण्यापिण्याच्या ठेल्यांवर आणि मोकळ्यावर रंगलेल्या गप्पांच्या कोंडाळ्यात!! 'नाही हो, हल्ली लोक नेटफ्लिक्सवर चावट सिनेमे बघत बसतात, पुस्तके कुठे कोण वाचतो?' असे आक्रंदन करणे सवयीचे होऊन गेलेल्यांनी एकदा स्वखर्चाने 'जयपूर लिट फेस्ट'ला चक्कर टाकून यावे. इतक्या लांब कशाला, मुंबई-पुण्यातही हल्ली छोटे-मोठे लिट-फेस्ट होतात, तिथे जावे.

हे 'फेस्ट' इंग्रजी असतात, म्हणून घाबरू नये. तिथे हिंदीत लिहिणारे-बोलणारे लेखकही असतात आणि मुख्य म्हणजे असतो, तो गर्दी करून जमलेल्या जाणत्या, प्रत्यक्ष काही वाचणाऱ्या वाचकांचा सळसळता उत्साह! कोणत्या 'लिट फेस्ट'मध्ये यंदा कोण लेखक आहे, ते ठरवून आपापले प्रवासाचे बेत आखणारे चोखंदळ वाचक या महाराष्ट्र भूमीतही आहेत. ते साहित्य संमेलनांच्या वाट्याला जाईनासे झाले आहेत; कारण त्यांना आकर्षून घेईल, अशी कसलीच 'जादू' या मराठी मंडपात नसते. ज्यांच्यावर जीव ओवाळून टाकावा, अशा साहित्यिकांची जुनी पिढी काळाच्या पडद्याआड झाली, मधल्या पिढीची सुगी तशी कोरडीच गेली आणि नव्या माध्यमात नवे प्रयोग करणारे हरहुन्नरी नव-निर्मिक साहित्य वा अन्य कलाक्षेत्रात आहेत, याचा महामंडळाला अद्याप पत्ताच नाही! त्यातून 'मराठी' या एकाच भाषेचे काटेकोर रिंगण आखलेले! सगळा खेळ त्याच्या आतच मांडायचा, तर इतक्या अटीशर्ती असलेल्या आणि केवळ गट-तट, ओळखी-पाळखी एवढेच जाणणाऱ्या या जुनाट गदळ वाड्यात जगभरातल्या सर्जनाचे वारे येणार कसे? स्वत:च्या कोंकणीपणावर स्वत:च कोट्या करून मिश्कील हसणारे विंदा आता नाहीत.

कोटजाकिटे घालून आणि साड्यांचे पट्टे काढून साहित्य क्षेत्रातले कारभारी म्हणून मिरविणाऱ्यांनी 'तेच ते आणि तेच ते' ही विंदाची कविता निदान साहित्य संमेलनापुरती खोटी ठरविली, तर विंदा जिथे असतील, तिथे खूशच होतील!

# नंतर आलेले लोक..

## मूल्ये पायदळी तुडवण्याचे आणि त्याविषयी विषादही नसण्याचे प्रमाण गेल्या तीन दशकांत वाढले आणि गेल्या दशकभरात त्याचे प्रत्यक्ष परिणामही दिसू लागले..

'एक दिशा मार्ग' किंवा 'प्रवेश बंद' या पाटीकडे दुर्लक्ष करून जगातील जे पहिले यंत्रचलित वाहन त्या रस्त्यावर घुसले असेल, तेव्हापासूनच खरे तर सुरुवात करायला हवी. सुरुवात कशाची? तर समाजाला समजून घेण्यास समाजशास्त्रज्ञ तोकडे पडू लागण्याची. आणि समाजशास्त्र तोकडे पडताहेत हे आताच का म्हणून आठवावे? तर 'प्रगल्भ लोकशाही' म्हणवणाऱ्या- आणि बऱ्याच अंशी तशी असणाऱ्या- अमेरिकेत परवा जे काही घडले त्यामुळे. माणसे नियम मोडतात, पळवाटांचा फायदा घेतात, किंवा कायद्याचे रक्षक म्हणवणारेही या नियममोडय़ा माणसांना साथ देतात हे सारे देशकालातीत पातळीवर दिसते. हे 'साधे' नियमभंग म्हणून बहुधा, समाजशास्त्रज्ञ गाफील राहिले. पण यातून पुढे, नियम मोडणारे इतके सोकावले की, तो केवळ नियमांचा नव्हे तर सामाजिक, राजकीय आणि नैतिकसुद्धा मूल्यांचा भंग ठरला. 'सरकारी इमारतीत सशस्त्र माणसांनी बळजबरीने घुसखोरी करू नये' हा नियम मोडून आपण नेमका कशाचा अपमान करतो आहोत, कोणती मूल्ये पायदळी तुडवतो आहोत, आपल्याच देशाची लाज कशी वेशीवर टांगतो आहोत हे स्वत:स ट्रम्पसमर्थक म्हणवणाऱ्यांना जणू बिनमहत्त्वाचे वाटत होते ही झाली घडामोड. पण अशा घडामोडी घडूच कशा शकतात, समाज इतका कसा काय बदलतो, हे समाजविज्ञानाच्या अभ्यासकांनी सांगायला नको? ते कुणी सांगितलेच नाही. म्हणून मग म्हणावे लागते की, समाजाला समजून घेण्यास समाजशास्त्रज्ञ तोकडे पडत आहेत. हा निव्वळ ठपका न ठेवता, असे का घडत असावे याविषयी काही अंदाजही बांधले पाहिजेत.त्यासाठी बदलत्या आर्थिक वास्तवापासून सुरुवात करावी लागेल. 'गिग इकॉनॉमी' हा शब्दप्रयोग अगदी अलीकडचा. स्थिरस्थावर नोकरीधंदा नसूनही पैका कमावण्याची पुरेपूर संधी, हा 'गिग इकॉनॉमी'चा अमेरिकी लोकांना तरी भावणारा अर्थ. थॉमस पिकेटीसारखे अभ्यासक या गिग इकॉनॉमीला दूषणे देत असले, तरी स्थावरतेची चव ज्यांच्या आदल्या पिढीने चाखली अशा युवावर्गाला गिग इकॉनॉमी म्हणजे जणू काही आर्थिक-सांस्कृतिक स्वातंत्र्याची संधी वाटते! यातले आर्थिक स्वातंत्र्य एक वेळ वादासाठी मान्य करता येईल, पण सांस्कृतिक स्वातंत्र्य कसले? पाय वर करून 'नेटफ्लिक्स' वा तत्सम नवमाध्यमांत रमण्याचे? 'स्वत:सह देशाच्या आर्थिक उत्कर्षासाठी काहीएक भांडवली गुंतवणूक करणे आवश्यक' मानणारा प्रगत देशांतील वर्ग आणि हा 'गिग'ची आर्थिक स्वातंत्र्ये उपभोगणारा वर्ग, यांत वरवर पाहता अकलेचाच फरक दिसेल. पण येथे कुणाची अक्कल काढण्याचा प्रश्न नसून अकलेला ज्यामुळे सुघटित असा आकार येतो त्या मूल्यांच्या अस्तित्वाचा प्रश्न आहे. अमेरिकी भांडवलशाहीने समतेपेक्षा स्वातंत्र्याचे मूल्य नेहमी महत्त्वाचे मानले. पण त्या स्वातंत्र्यासाठी व्यक्तीवर काहीएक जबाबदारी दिली. क्षमतांचा वापर किंवा वस्तूचा विनिमय करणाऱ्या कोणालाही, त्या बदल्यात डॉलर कमावण्याचे स्वातंत्र्य अमेरिकेने इतके दिले की, पु. ल. देशपांडे यांनी अमेरिकेतील ताई छोटय़ा भावाला खेळवल्याबद्दल आईकडून बेबीसिटिंगचे पैसे मागू शकते, याबद्दल खेद व्यक्त केला होता. या पुलंचा आवाज ऐकत मराठी संस्कृती टिकवणारी घरे अमेरिकेत आहेत, तिथे असे बेबीसिटिंगचे पैसे घ्यायचे नसतात याची समजही आजीआजोबांचे संस्कार म्हणून टिकली असणारच. पण मुद्दा काही ना काही मूल्यांच्या संदर्भात जगायचे असते, याची समज असण्याचा आहे. बेबीसिटिंगचे पैसे का घ्यावे यामागे मूल्यसंस्कार आहे तसा न घेण्यामागेही आहे. मात्र दोन्हीत मूल्ये आहेत. ती असावी लागतात. ही मूल्येच, समाजाचा अभ्यास करून काहीएक अंदाज वा ठोकताळे बांधण्यास उपयोगी पडतात. हॉब्ज, लॉक, रूसो या आधुनिक राज्यशास्त्राचा पाया रचणाऱ्या तत्त्वज्ञांनी मांडलेला 'सामाजिक करार', मिल-स्पेन्सर ते इसाया बर्लिनपर्यंत अनेकांनी अभ्यासलेले 'स्वातंत्र्य' ही अमेरिकादी पाश्चात्त्य प्रगत समाजांची धारणा करणारी मूल्ये आहेत, हे जगभरच्या समाजशास्त्रज्ञांनी जणू गृहीतच धरले होते.ते गृहीतक तपासण्याची शेकडो कारणे जणू मानवी रूप घेऊन, अमेरिकी कॅपिटॉल हिलच्या छाताडावर तेथील '६ जानेवारी'स थयथया नाचली. लोकशाही मूल्यांच्या संहाराचा तो नंगानाच पाहून व्यथित होणे सोपे. पण इथवर आपण कसे आलो, याचा विचार करणे अधिक महत्त्वाचे. जो अमेरिकी समाज स्वत:स जगापेक्षा अव्वल समजूनच ऊठबस करतो त्याच समाजात असे घडावे हे तर जगाविषयीही बरेच काही सांगणारे. जगभरातच हे- मूल्ये पायदळी तुडवण्याचे आणि त्याविषयी विषादही नसण्याचे- प्रमाण गेल्या तीन दशकांत वाढले आणि गेल्या दशकभरात त्याचे प्रत्यक्ष परिणामही झपाटय़ाने तसेच सर्वदूर दिसू लागले. ही तीन दशकेच नेमकी कामगारवर्ग, मध्यमवर्ग यांच्या आर्थिक व नैतिक बदलांचा काळ म्हणून जगभर ओळखली जातात, हा काही योगायोग नव्हे. समाज-अभ्यासकांनी हा बदल जाणला, त्याबद्दल भरपूर लिहिले. पण समाजातले काही तरी कोसळते आहे म्हणून समाजात पोकळी निर्माण होत नाही, उलट ऱ्हासाची भरपाई वेगळय़ा वा भलत्याच पद्धतीने सतत होत असते, यावर बोट ठेवणारा अभ्यास पुरेसा झाला नाही. त्यामुळे मग, कोणतीही मूल्यव्यवस्था न मानता सैराटल्याप्रमाणे राजकारण करणारा तरुण हा नेमका कसा 'घडला' याची कल्पनाच आज कुणाला नाही. हा तरुण गेल्या तीन दशकांपासून एवढा नुसताच संख्येने 'वाढला' आहे की, यापैकी काही आज चाळिशीच नव्हे तर पन्नाशीत आहेत. म्हणजे गेली तीसेक वर्षे मूल्यहीन तरुणांचा नेमका अभ्यास होत नसताना, इंटरनेटचे महाजाल मात्र फोफावत होते. समाजमाध्यमांतून अल्लदपणे मुख्य धारेतील माध्यमांवर उडी मारून 'पोस्ट-ट्रथ' बोकाळत होते. त्याआधीपासून खलनायकाचा वा त्याच्या कैक साथीदारांचा खून करणारे- आणि तरीही शेवटच्या रिळात नायिकेसह हसऱ्या चेहऱ्याने पडद्यावर दिसणारे – फिल्मी नायक तर १९६० च्या दशकापासून जगभरच



व्यावसायिक चित्रपटांच्या 'मुख्य धारे'तून घरोघरीच्या शाळकरी मुलांपर्यंत पोहोचले होते. आपापल्या देशातील 'अँग्री यंग मॅन'चे आदर्श ठेवणारी ती पिढी आणि आज 'रीअल हिरोज' म्हणून ज्यांना ट्रेण्ड केले जाते त्यांना बिनबोभाट अधिमान्यता (लेजिटिमसी) देणारी पिढी, यात कुणाला प्रगतीचे लक्षण दिसले तर तो व्यक्तिस्वातंत्र्याचा प्रश्न म्हणून सोडून देऊ.पण अभ्यासकांना तसे करता येणार नाही. हा मूल्यऱ्हास कधी झाला, कुठे आणि कसा झाला, ग्रीकांपासून आजतागायतच्या आधुनिकांपर्यंत ज्या मूल्यांचा अभ्यास होत होता ती काही देशांना अचानक आपापल्या धर्मापुढे फिकीच कशी काय भासू लागली, असल्या भासांतून भले कोणाचे झाले, अमेरिका वा ब्रिटन यांना पुन्हा 'एकटेच ग्रेट' होण्याची स्वप्ने कशी काय पडली आणि ती स्वप्ने विकणाऱ्या गल्लाभरू राजकारण्यांचा धंदा कसा फळफळला, याविषयी सुटे-सुटे अभ्यास आजवर बरेच झाले. पण यापुढे तरी, जगभरातच सर्वांगीण प्रगतीच्या नावाखाली नैतिक अधोगती कशी काय विकली जाते आहे आणि ती विकत घेणारे लोक कोण आहेत, ते लोक कधी आणि कोणानंतर आलेले आहेत, याचा अभ्यास व्हावा लागेल. या 'नंतर आलेल्या लोकां'पैकी कुणीतरी कॅपिटॉल हिलवर तिरंगा फडकावल्याचा दावाही ट्विटरवरून केला जातो आहे, हे लक्षात घेता भारतीय अभ्यासकांनीसुद्धा यात मागे राहू नये.

# अमली पदार्थविक्री प्रकरणी ब्रिटिश नागरिकाला अटक

मुंबई : मुंबईसह देशभरातील उच्चभ्रू व्यक्तींना परदेशी गांजा (कुश, क्युरेटेड मॅरीऑना) पुरवणाऱ्या भारतीय वंशाच्या ब्रिटिश नागरिकाला अमली पदार्थविरोधी पथकाने (एनसीबी) खार येथून अटक केली.करण सजनानी असे आरोपीचे नाव असून त्याला मदत करणाऱ्या मुंबईतील दोन तरुणींनाही एनसीबीने अटक केली आहे. सजनानीने मुंबई, महाराष्ट्रासह गोवा, तमिळनाडू, आंध्रप्रदेश आणि मेघालयमध्ये मोठय़ा प्रमाणावर परदेशी गांजा पुरविल्याची माहिती पुढे आली आहे.एनसीबीने सजनानीच्या खार येथील घरी छापा घालून सुमारे २०० किलो गांजा आणि प्रतिबंधीत सीबीडी स्प्रे जप्त केला. यापैकी काही भाग अमेरिकेहून तस्करी करत भारतात आणण्यात आला होता. तर काही भाग उत्तरप्रदेश येथून आणण्यात आला होता.ब्रिटनहून दीड वर्षांपूर्वी भारतात आलेला सजनानी हा सुशांत सिंह राजपूत आत्महत्याप्रकरणातही संशयीत आहे. त्याच्या ग्राहकांची चौकशी केली जाईल, असे एनसीबी अधिकाऱ्याने स्पष्ट केले.सजनानीच्या चौकशीतून राहिला फर्निचरवाला आणि तिची बहिण शाहिस्ता यांची नावे समोर आली. राहिला ही सजनानीला अर्थसहाय्य करण्यासह अमली पदार्थाची आयात-निर्यात, वाहतूक, विक्री, साठवणूक करण्यासाठी सहकार्य करत होती. तर शाहिस्ता अमली पदार्थाचे सेवन करत होती, असा दावा एनसीबीने केला. राहिला ही काही वर्षांपूर्वी अभिनेत्री दिया मिर्झाकडे व्यवस्थापक म्हणून काम करत होती, असेही समोर आले आहे.अर्जुन रामपालच्या बहिणीला समन्सअभिनेता अर्जुन रामपालची बहीण कोमल हिला एनसीबीने समन्स पाठवून सोमवारी चौकशीस बोलावले आहे. याआधीही तिला चौकशीस बोलावले होते. मात्र ती गैरहजर राहिली. एनसीबीने अर्जुन आणि त्याची प्रेयसी गॅब्रीएला डेमॅट्रीएड्स यांच्या निवासस्थानी छापा घालून प्रतिबंधित औषधांचा अंश जप्त केला होता. याप्रकरणी अर्जुन आणि गॅब्रीएला यांची एनसीबीने चौकशीही केली होती.

# मुंबई विमानतळावर 'आरोग्य सेतू' ची सक्ती; स्व-घोषणापत्रांचा विसर

ज्या विमान प्रवाशांना 'आरोग्य सेतू' अॅप डाऊनलोड करायचे नसेल, त्यांच्यासाठी स्व-घोषणापत्र भरून देण्याचा पर्याय आहे. मात्र, मुंबई विमानतळावरील कर्मचारी 'आरोग्य सेतू' अॅप डाऊनलोड करण्याची सक्ती करीत असल्याचे समोर आले आहे.केंद्र सरकारने विमान आणि रेल्वे प्रवाशांना 'आरोग्य सेतू' हे अॅप मोबाइलवर डाऊनलोड करणे बंधनकारक नसल्याचे कर्नाटक उच्च न्यायालयात स्पष्ट केले. त्यानंतर देशातील बहुतांश विमानतळावर आरोग्य सेतू अॅपबद्दल विचारणा केली जात नाही. मात्र, मुंबई विमानतळावर अॅपचा आग्रह धरला जात आहे. त्यासाठी प्रवाशांवर दबाव टाकला जात आहे. स्व-घोषणापत्राच्या पर्यायाबद्दल प्रवाशांना सांगितले जात नाही. अॅपची सक्ती कशाच्या आधारावर केली जात आहे, याची माहिती देखील विमानतळ व्यवस्थापनाला नाही.'आरोग्य सेतू अॅप'ची तपासणी करण्यात आपल्या कर्मचाऱ्यांची कोणतीही भूमिका नाही, असे इंडिगो एअरलाइन्सचे कॉर्पोरेट कम्युनिकेशन व ब्रँड रेप्युटिशन संचालक सी. लिखा यांनी सांगितले.यासंदर्भात विमानतळाच्या व्यवस्थापनातील सक्षम अधिकाऱ्यांच्याशी संपर्क साधला असता, त्यांनी प्रवाशांना अॅप मोबाइलवर डाऊनलोड करणे बंधनकारक आहे, असे सांगितले. त्यावर कर्नाटक उच्च न्यायालयात केंद्र सरकारने अॅप मोबाइलवर डाऊनलोड करणे अनिवार्य नसल्याचे प्रतिज्ञापत्र सादर केल्याचे सांगितले, तर तो कर्नाटकपुरता निर्णय असेल, मुंबई आणि दिल्ली विमानतळावर आरोग्य सेतू अॅप आवश्यक आहे, असे उत्तर त्यांनी दिले.

## मिरा भाईंदर महानगरपालिका
**प्रभाग कार्यालय क्र. ५**
मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण ८ मधील कलम १ (२) नुसार
**// नोटीस //**

सर्व संबधितांस कळविण्यात येते की, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती क्र.५ च्या कार्यक्षेत्रातील मालमत्ता कर वसुली अंतर्गत **रुम नं. ६०२, बिल्डींग एच२, पूनम सागर कॉम्पेलक्स १ ते ५ को.ओ.हा.सो., सेक्टर ९ समोर, १००फुट रोड मीरारोड पूर्व, ठाणे ४०११०७** येथील मनपा मालमत्ता क्रमांक **ई१२००३०७७६०७५** ही मालमत्ता महानगरपालिका दप्तरी **कैलाशवती डी. मेहरा** आणि इतर यांचे नावावर आहे. परंतु कैलाशवती डी. मेहरा यांचा मृत्यु दि ३०/१२/२०१५ रोजी झाला. त्यामुळे सदर मालमत्ता **मुलगा** या नात्याने **अनिल डी. मेहरा** यांनी महानगरपालिका कडे अर्ज करुन मालमत्ता नावे करणेकरीता मागणी केलेली आहे. तरी सदर मालमत्तेबाबत कोणतीही हरकत / अगर तक्रार असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खाली सही करणार यांचे कार्यालयात लेखी आवश्यक कागदपत्रासह सादर करावी. मुदती नंतर आलेल्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही. यांची संबधितांनि नोंद घ्यावी.

सही
प्रभाग अधिकारी
**प्रभाग समिती कार्यालय क्र.५**
मिरा भाईंदर महानगरपालिका

## मिरा भाईंदर महानगरपालिका
**प्रभाग कार्यालय क्र. ५**
मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण ८ मधील कलम १ (२) नुसार
**// नोटीस //**

सर्व संबधितांस कळविण्यात येते की, मिरा भाईंदर महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती क्र.५ च्या कार्यक्षेत्रातील मालमत्ता कर वसुली अंतर्गत **रुम नं. ६०१, बिल्डींग एच२, पूनम सागर कॉम्पेलक्स १ ते ५ को.ओ.हा.सो., सेक्टर ९ समोर, १००फुट रोड मीरारोड पूर्व, ठाणे ४०११०७** येथील मनपा मालमत्ता क्रमांक **ई१२००३०७७६०७४** ही मालमत्ता महानगरपालिका दप्तरी **कैलाशवती डी. मेहरा** आणि इतर यांचे नावावर आहे. परंतु कैलाशवती डी. मेहरा यांचा मृत्यु दि ३०/१२/२०१५ रोजी झाला. त्यामुळे सदर मालमत्ता **मुलगा** या नात्याने **अरुण डी. मेहरा** यांनी महानगरपालिका कडे अर्ज करुन मालमत्ता नावे करणेकरीता मागणी केलेली आहे. तरी सदर मालमत्तेबाबत कोणतीही हरकत / अगर तक्रार असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून चौदा दिवसांचे आत खाली सही करणार यांचे कार्यालयात लेखी आवश्यक कागदपत्रासह सादर करावी. मुदती नंतर आलेल्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही. यांची संबधितांनि नोंद घ्यावी.

सही
प्रभाग अधिकारी
**प्रभाग समिती कार्यालय क्र.५**
मिरा भाईंदर महानगरपालिका

## मिरा भाईंदर महानगरपालिका
**प्रभाग कार्यालय क्र.१**
जा.क्र. मनपा/प्र.का.क्र.१/आर९४/१६२४/२०२०-२१ दिनांक :-२१/१२/२०२०
**// नोटीस //**

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील भाईंदर (प.) प्रभाग कार्यालय क्र.१ क्षेत्रातील राई मुर्धे विभागातील झोन क्र.आर०२ येथील मालमत्ता क्रमांक **आर०२००२३३१७०००** सदनिका क्र.००१ असून पत्ता राई सदानंद नगर, भाईंदर (प.) या **खोलीस** सन २०२०-२१ मध्ये **श्री राजाराम नरोत्तम पाटील** या नावाची नोंद महानगरपालिका दफ्तरी नोंद आहे. तरी वारस **मुले** या नात्याने **श्री लैलेश/नितीन राजाराम पाटील** यांनी दि.१६/१०/२०२० लेखी अर्ज करून सदरची मालमत्ता हस्तांतरण करणेकरीता मागणी केलेली आहे. मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ प्रकरण ८ मधील कलम १ (२) नुसार नावात बदल करणेबाबत प्रसिध्दी देण्यात येत आहे.

सदर मिळकती बाबतचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.
पूर्वेस - श्रीम. नर्मदा यशवंत पाटील यांचे घर
पश्चिमेस - श्रीम. यशोदा म्हात्रे यांचे घर
दक्षिणेस - श्री नरहरी पाटील यांची चाळ
उत्तरेस - मीठ आगर

वरील मालमत्ता हस्तांतरणाबाबत कुणाचीही तक्रार व हरकत करावयाची झाल्यास **१४** दिवसांचे आत प्रभाग कार्यालय क्र. **१** येथे कार्यालयीन वेळेत लेखी पुराव्यासह कागदपत्र दाखल करावे मुदती नंतर आलेल्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही.

सही/-
प्रभाग अधिकारी
प्रभाग कार्यालय क्र.१
मिरा भाईंदर महानगरपालिका

# रेतीचे उत्खनन करुन चोरी करणाऱ्या आरोपीला सफाळा पोलीसांनी केले जेरबंद



दारशेत- उंबरपाडा जवळील मंगलडोहा रेतीबंदरात ता. जि. पालघर, येथे आरोपी पिंकेश विश्वनाथ तरे (वय-३६) राहायला. वसई ता. पालघर यांनी वाळू/ रेतीचे उत्खनन व वाहतूक नियमावली केलेली असताना, सदर भागात असलेल्या नदी किनारी किंवा खाडी किनारी रेती उत्खनन केली. शासनाची परवानगी नसताना देखील दारशेत- उंबरपाडा जवळील मंगलडोहा रेती बंदरात अवैद्यरित्या रेती भरून वाहतूक करताना सफाळा पोलीसांना मिळून आले. सदरची घटना दि. ०५/०१/२०२१ रोजी ४:३० च्या दरम्यान घडली. सफाळा पोलीसांनी आरोपी पिंकेश तरे याच्या ताब्यातून तब्बल १) १५,००,०००/- रुपये किमतीचा हायवे मो.ट्रक २) ४८,०००/- रुपये किमतीची आयवा मो.ट्रक आणि त्यामधील एकूण ०४ ब्रास रेती ३) १८,००,०००/- रुपये किमतीचा जेसीबी ४) १८,००,०००/- रुपये किमतीचा आणखीन एक जेसीबी ट्रक असा एकूण ५१,४८,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. दिनांक. ०५/०१/२०२१ रोजी आरोपी पिंकेश तरे याला अटक करण्यात आली असून "सफाळा पोलीस ठाणे" गु. रजि क्र. ०१/२०२१ भा द वि स कलम ३७९,३४ महाराष्ट्र जमीन महसूल कायदा सन १९६६ चे कलम ४८(७) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे तसेच पुढील तपास चालू आहे . सदरची कामगिरी सहायक पोलीस निरीक्षक श्री. संदीप कहाळे, प्रभारी अधिकारी सफाळा पोलीस ठाणे यांच्या मार्गदर्शनाखाली सफाळा पोलीस ठाण्याचे अधिकारी कर्मचारी यांनी केली आहे.

# शरीरास प्राणघातक अशा अंमलीपदार्थाचे सेवन करणाऱ्या 4 सराईतांना मिरा रोड पोलीसांनी केली अटक




मीरा रोड पूर्व येथे बेव्हरली पार्क म्हाडा बिल्डिंग जवळ दिनांक रोजी रात्री काही इसम अंमली पदार्थांची विक्री करण्यासाठी येणार असल्याची गोपनीय बातमी मिरारोड पोलिसांना मिळाली. त्यानुसार मीरा रोड पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक संदीप कदम यांनी त्यांच्या पथकासह म्हाडा बिल्डिंग जवळ सापळा रचून ४ आरोपींना ताब्यात घेतले. हे सर्व आरोपी कापड विक्री व्यापारी असून त्यांच्याकडून २,१३,५००/- रुपये किंमतीचे ३०.५ ग्रॅम कोकेन अंमली पदार्थ व २४००००/-रुपये किमतीचे २४ ग्रॅम एम.डी. (मेफेड्रॉन) अंमली पदार्थ असे एकूण ४,५३,५००/-रुपयांचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आले.सदर आरोपींच्या विरुद्धात मीरा रोड पोलीस ठाण्यात गु.रजि.नं. १४/२०२१ एन.डी. पी. एस. कायदा कलम ८(क), २०(क),२२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदरची कामगिरी श्री. अमित काळे, पोलीस उप आयुक्त परिमंडळ-१, श्री विलास सानप, सहाय्यक पोलीस आयुक्त, मिरारोड विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप कदम, पोलीस निरीक्षक. चव्हाण, पोलीस निरीक्षक कांबळे यांनी केली आहे.

# उद्धव ठाकरे 'ॲक्शन मोड'मध्ये, बर्ड फ्ल्यू रोगाबाबत जिल्हाधिकाऱ्यांना दिल्या महत्त्वाच्या सूचना



मुंबई, बर्ड फ्ल्यूसंदर्भात अफवा व चुकीची माहिती पसरू नये यासाठी प्रशासनाने नागरिकांना योग्य व वस्तुनिष्ठ माहिती द्यावी. माणसांमध्ये या रोगाचे संक्रमण होत नसल्याने घाबरण्याचे कारण नाही, असं आवाहन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी केलं आहे. बर्ड फ्ल्यू संदर्भात राज्यातील परिस्थितीचा आढावा मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी वर्षा निवासस्थान येथील समिती सभागृहात घेतला. यावेळी पशुसंवर्धन मंत्री सुनील केदार, अतिरिक्त मुख्य सचिव सीताराम कुंटे, पशुसंवर्धन विभागाचे प्रधान सचिव अनुप कुमार, पशुसंवर्धन आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह,मुख्यमंत्र्यांचे अतिरिक्त मुख्य सचिव आशिष कुमार सिंह, मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव विकास खारगे उपस्थित होते.

मुख्यमंत्र्यांच्या महत्त्वपूर्ण सूचना :

उद्धव ठाकरे यांनी बर्ड फ्लू संदर्भात आढावा घेवून नंतर लगेचच राज्यातील सर्व जिल्हाधिकाऱ्यांना व्हीसीद्वारे बर्ड फ्लू संक्रमण आणि घ्यावयाची काळजी या संदर्भात निर्देश दिले. या संदर्भातील निर्देशांची गांभीर्याने अंमलबजावणी करण्याच्या सूचना दिल्या. या रोगाचे तात्काळ निदान होण्याकरीता राज्यामध्ये पशुसंवर्धन विभागासाठी जैवसुरक्षास्तर अद्ययावत प्रयोगशाळा स्थापन करण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्यात येईल. त्याची कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. ज्या भागात बर्डफ्लू रोगाची लागण नाही अशा भागात अंडी व मांस 70 डीग्री पेक्षा जास्त तापमानात शिजवून खाल्ल्यास काहीही धोका नसल्याचे नमूद करून याबाबत गैरसमज व अफवा पसरविण्यात येवू नयेत, असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

दरम्यान, यावेळी पशुसंवर्धन आयुक्त सचिंद्र प्रताप सिंह म्हणाले की, परभणीत 843 कोंबड्या, ठाण्यात बगळे व इतर पक्षी मिळून 15, रत्नागिरीत 9 कावळे यांचे बर्ड फ्लू अहवाल एच5एन1 व बीड येथील 11कावळ्यांचा अहवाल एच5एन8 असा आला आहे. उर्वरित ठिकाणचे अहवाल भोपळहून प्राप्त व्हायचे आहेत.

पशुसंवर्धन विभागाने बर्ड फ्लू मार्गदर्शक सूचना क्षेत्रीय अधिकाऱ्यांना पाठविल्या आहेत. केंद्र शासनाच्या उपाययोजनांच्या कृती आराखड्याप्रमाणे क्षेत्रीय अधिकाऱ्यांना व्हीसीद्वारे या सूचनांची गांभीर्याने अंमलबजावणी करण्यात यावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. 7 जानेवारीपासून कंट्रोल रूम स्थापित केले असून मृत पक्षांची माहिती घेणे सुरू आहे. पक्षांचे नमुने भोपाळ येथील प्रयोगशाळेत पाठविण्यात यावे अशाही सूचना देण्यात आल्या असल्याचे त्यांनी सांगितले.

# पतसंस्थेच्या महिला संचालकाची हत्या



पालघर, पालघर शहरात एका पतसंस्थेच्या महिला संचालकाची भरवस्तीत असलेल्या कार्यालयात शनिवारी हत्या करण्यात आली आहे. याप्रकरणी पोलिसांनी सुमारे पाच जणांना चौकशीसाठी ताब्यात घेतले असून, काही महत्त्वाचे धागेदोरे हाती लागल्याचे सांगितले आहे. पालघर शहरातील रेल्वे स्थानकाजवळील शुक्ला कंपाऊंड येथील एका इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर अष्टविनायक पतसंस्थेचे कार्यालय आहे. या पतसंस्थेच्या संचालिका साधना रामकृष्ण चौधरी (वय ५७, रा, सातपाटी) या शनिवारी सायंकाळी उशिरापर्यंत कार्यालयात हिशेबाचे काम करीत बसल्या होत्या. मात्र शनिवारी घरी उशिरापर्यंत त्या पोहोचल्या नसल्याने कुटुंबीयांनी त्यांच्या मोबाइलवर फोन केला असता, त्याला प्रतिसाद मिळाला नाही. त्यामुळे कुटुंबीयांनी पतसंस्थेच्या समोरच्या फ्लॅटमध्ये चालणाऱ्या ट्यूशन क्लासच्या संचालक त्रिवेदी यांना फोन केला असता, त्यांनी प्रत्यक्ष कार्यालयात जाऊन पाहिले. त्यावेळी साधना चौधरी या रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या आढळल्या. त्यानंतर त्यांनी तातडीने पोलिस आणि कुटुंबीयांना याची माहिती दिली.

# देवी-देवतांच्या नावाने यंत्र-तंत्र विक्री जाहिरातीवर बंदी; औरंगाबाद खंडपीठाचा मोठा निर्णय



देवी देवतांच्या नावाने यंत्र-तंत्र, खडे मणी, यांची विक्री करण्याची तसेच प्रसार माध्यमांवर त्यांची जाहिरात दाखवण्यास औरंगाबाद खंडपीठाने बंदी घालण्याचे आदेश दिले आहे. अशा प्रकारच्या यंत्रांची विक्री उत्पादन प्रचार व प्रसार करणाऱ्या अघोरी कृत्य आणि जादूटोणा कायद्यानुसार यावर गुन्हे दाखल करण्याचे आदेश औरंगाबाद खंडपीठानं दिला आहे. प्रसारमाध्यमात देवी-देवतांची नावे यंत्र-तंत्र विक्रीच्या जाहिराती प्रसारित करण्यात येतात, अशा प्रकारच्या यंत्राचे उत्पादन विक्री आणि प्रचार-प्रसार करण्याविरोधात अघोरी कृत्य आणि जादूटोणा कायद्याअंतर्गत गुन्हे दाखल करा तसेच, या प्रकरणी कारवाई करण्यासाठी काय पावले उचललेली आहेत? याची माहिती तीन दिवसात सादर करण्याचे आदेश औरंगाबाद खंडपीठाने दिले आहे. सर्वसामान्य नागरिकांची अशा भोंदूगिरीच्या माध्यमातून लूट केली जाते. राज्यशासनाच्या २०१३ मधील अघोरी कृत्य व काळी जादू कायद्यानुसार या गोष्टींचे प्रसारमाध्यमांवर प्रक्षेपण करता येत नाही. याविरुद्ध २०१५ मध्ये औरंगाबाद येथील राजेंद्र गणपतराव अंभोरे (रा. टाऊनसेंटर, सिडको, औरंगाबाद) यांनी औरंगाबाद खंडपीठात याचिका दाखल केली होती. समाजात विज्ञाननिष्ठ नागरिक तयार होऊन वैज्ञानिक वातावरणास गती मिळावी, अंधश्रद्धेचे निर्मूलन व्हावे यासाठी संबंधित २०१३ चा कायदा निर्माण केला. प्रत्येक पोलिस ठाण्यात पोलिस निरीक्षकांच्या समवेत अशा बाबींवर प्रतिबंध घालण्यासाठी एक अधिकारी नियुक्त केलेला आहे. कायद्याच्या माध्यमातून भोंदूगिरीला वेसण घालावी अशी मागणी याचिकेत करण्यात आली होती. संबंधित याचिकाकर्ते अंभोरे यांनी याचिका नंतर मागे घेण्याची विनंती खंडपीठास केली होती. खंडपीठाने याचिका समाजासाठी महत्वाची असल्याने पुढे चालू ठेवली. न्यायालयाचे मित्र म्हणून बाजू मांडण्यासाठी ज्येष्ठ विधिज्ञ विजयकुमार सपकाळ यांची नियुक्ती केली. राज्य शासनाच्या वतीने सहाय्यक सरकारी वकील महेंद्र नेर्लीकर यांनी तर केंद्राच्यान वतीने डी. जी. नागोडे यांनी काम पाहिले. यंत्र बनविणाऱ्या प्रतिवादी कंपनीतर्फे सचिन सारडा हजर झाले होते.

# महाराष्ट्र पोलिसांची आणखी एक कामगिरी; पश्चिम बंगालमधील तरुणीला मिळवून दिलं घर



**काही दिवसांपूर्वी महाराष्ट्र पोलिसांनी आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या तरुणीचा जीव वाचवला होता..**

ठाणे, घरातून भांडण करुन पश्चिम बंगालहून आलेल्या एका 27 वर्षीय तरुणीला महाराष्ट्र पोलिसांनी तिच्या कुटुंबासोबत भेट करुन दिली. एका अधिकाऱ्याने सोमवारी याबाबत सांगितलं. पोलिसांच्या गस्ती पथकाने या तरुणीला 26 डिसेंबर 2020 रोजी नवी मुंबईतील वाशी रेल्वे स्टेशनवर भटकत असताना पाहिलं होतं.

वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजीव धूमल यांनी सांगितलं की, चौकशी केल्यानंतर तरुणीने सांगितलं की, ती पश्चिम बंगालमधील उत्तर 24 परगना जिल्ह्यातील आपलं घर सोडून तीन-चार दिवसांपासून वाशी रेल्वे स्टेशवर राहत आहे. तिने सांगितलं की, महिलेने पोलिसांनी काही काळासाठी राहण्याची व्यवस्था करण्याची विनंती केली होती. यानंतर ठाण्यातील महिलेने तिला जेवू घातलं आणि राहण्यासाठी तात्पुरत्या स्वरुपाची व्यवस्था केली. दुसऱ्या दिवशी पोलिसांनी तिला आश्रम गृहात भरती केलं आणि कुटुंबीयांना सूचना दिली. आश्रमातील प्रमुख तरुणीच्या कुटुंबीयांच्या संपर्कात होते. घरात वाद झाल्यानंतर तरुणी घर सोडून निघून आली होती. महिलेच्या कुटुंबीयांनी बारासात पोलीस ठाण्यात बेपत्ता झाल्याची तक्रार नोंदवली होती. अधिकाऱ्यांनी सांगितलं की, वाशी पोलीस ठाण्यातील अधिकाऱ्यांनी तरुणीच्या कुटुंबीयांशी संपर्कात होते. तरुणीला रविवारी त्यांच्या स्वाधीन करण्यात आलं. (Another achievement of Maharashtra Police I got a house for a young woman from West Bengal) त्यांनी सांगितलं की, पोलिसांनी महिलेच्या सुरक्षेसाठी पाऊल उचलली. आम्हाला आनंद आहे की, पोलीस समाजातील नागरिकांच्या आनंदासाठी काम करीत आहे.

# 'त्या' हत्येचे गूढ उकलले; आई आणि मोठ्या भावाने म्हणून काढला काटा!



ठाणे: ठाण्यातील सतीश आगळे (२३ ) या तरुणाची हत्या करून मृतदेह कसारा घाटात फेकल्याच्या प्रकरणाला धक्कादायक वळण लागले असून ही हत्या या तरुणाची आई, मोठा भाऊ आणि अन्य एक नातेवाईक अशा तिघांनी मिळून केल्याची बाब ठाणे ग्रामीण पोलिसांच्या चौकशीमध्ये निष्पन्न झाली आहे. पोलिसांनी तिन्ही आरोपींना अटक केली आहे. या हत्येमागचे कारणही तितकेच धक्कादायक असून काहीच काम न करणारा सतीश पैशाची मागणी करत असे. पैसे न दिल्यास मारण्याची धमकी दिली होती. शिवाय तो त्रासही देत होता. याच त्रासाला कंटाळून आरोपींनी सतीशची हत्या केली. मूळचा नंदुरबारचा असलेला आणि सध्या ठाण्यातील चिरागनगर भागात राहणारा सतीश आगळे याची हत्या केल्यानंतर मृतदेह गोणीत बांधून कसारा घाटामध्ये दरीत फेकून देण्यात आला होता. या प्रकरणी ९ जानेवारी रोजी कसारा पोलीस ठाण्यात सतीशचा मोठा भाऊ शिवाजी याने दिलेल्या तक्रारीनंतर हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने यांनी लवकरात लवकर हत्येची उकल करण्याचे आदेश स्थानिक गुन्हे शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक सुरेश मनोरे यांना दिल्यानंतर गुन्हे शाखेच्या पथकाने चौकशी सुरू केली. चौकशीमध्ये सतीश याचा भाऊ शिवाजी आणि आई मायाबाई यांचे बोलणे तसेच वागण्याबाबत पोलिसांना संशय आला. त्यांच्याकडे केलेल्या सखोल चौकशीअंती या हत्येचा उलगडा झाला.

सतीशच्या त्रासाला कंटाळून ७ जानेवारीला पहाटे शिवाजी, मायाबाई आणि अमृत बिरारे या तिघांनी आपसात संगनमत करून घरातच सतीशची तीक्ष्ण हत्याराने हत्या केली. नंतर पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह प्लास्टिकच्या गोणीत भरून कारने मृतदेह कसारा घाटात आणला आणि मृतदेह घाटात फेकून दिला. आरोपींनी गुन्ह्याची कबुली दिली असल्याची माहिती ग्रामीण पोलिसांनी दिली. तिन्ही आरोपींना न्यायालयाने १५ जानेवारीपर्यंत पोलीस कोठडी दिली आहे. तुमच्या मुलाचे कपडे आणि मुलगा कसारा घाटात आहे, असा सतीशच्या मोबाइलवरून मायाबाई यांना ९ जानेवारी रोजी सकाळी फोन आला होता.

# चार नायजेरियन नागरिकांना अटक

मिरा-भाईंदर, मिरा रोड पोलिसांनी शहरात अंमली पदार्थांची विक्री करणाऱ्या चार नायजेरियन नागरिकांना शनिवारी रात्री सापळा रचून अटक केली. त्यांच्याकडून पोलिसांनी एकूण ४ लाख ५० हजार रुपये किंमतीचे अंमली पदार्थ जप्त केले आहेत. मिरा रोडच्या कनकिया पोलिस ठाण्याच्या हद्दीत असणाऱ्या म्हाडाच्या इमारतीजवळ शनिवारी रात्री नायजेरियन नागरिक अंमली पदार्थांची विक्री करण्यासाठी येणार असल्याची माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक संदीप कदम यांना मिळाली होती. त्यानुसार पोलिस निरीक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आठ कर्मचाऱ्यांचे एक पथक तयार करण्यात आले. त्यांच्या मदतीने म्हाडा इमारतीच्या प्रवेशद्वाराजवळ रात्री ११ वाजण्याच्या सुमारास सापळा रचला असता दोन नायजेरियन नागरिक त्याठिकाणी संशयास्पद स्थितीत उभे असल्याने त्याची झाडाझडती घेण्यात आली. त्यावेळेस एका नायजेरियन नागरिकाच्या खिशामध्ये ५.५ ग्रॅम, तर त्याच्या दुसऱ्या साथीदाराकडे ५ ग्रॅम कोकेन आढळून आला. त्यामुळे पोलिसांनी दोघांची चौकशी केली असता त्यांनी आपले आणखी दोन साथीदार म्हाडाच्या इमारतीमधील एका खोलीमध्ये राहत असून आम्ही बेकायदा व्यवसाय करत असल्याची कबुली दिली. त्यांच्या घराचीदेखील पोलिसांकडून झाडाझडती घेण्यात आली. तेव्हा घरामध्ये पोलिसांना २० ग्रॅम एमडी आढळून आल्याने तो जप्त केला आहे. याप्रकरणी कनकीय पोलिसांनी मोरीबा टोकपा, न्वीकी लिवीनीस, बेन्सीन थॉमस व ओनीअँग थॉमस या चार जणांना अटक केली. त्यांच्याकडून दोन लाख १३ हजार रुपये किमतीचे कोकेन व दोन लाख ४० हजार रुपये किमतीचा एमडी जप्त करून कलम ८(क),२०(क) व २२ प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# बोईसर येथील मंगलमय ज्वेलर्स वरील दरोड्याच्या आरोपींना काही तासातच बोईसर पोलीसानी केली मुद्देमालासह धरपकड




बोईसर येथील साई शॉपिंग सेंटर मधील मंगलमय ज्वेलर्स दुकानामध्ये दिनांक. २९/१२/२०२० ते ३०/१२/२०२० रोजी ०८:३०वाजताच्या दरम्यान घरफोडी झाली होती सदर घरफोडीत आरोपी यांनी दुकानातील तिजोरी व ड्राव्हर गॅस कटरच्या सहाय्याने तोडून ७,००,१७,२३५/- रुपये किमतीचे सोने दागिने व ६०,००,०००/- रोख रक्कम असे एकूण ७,६०,१७,२३४/- रुपये किमतीचा माल घरफोडी चोरी करून नेला. त्यावरून सदर दुकानाचे मालक यांनी आरोपी विरुद्ध दिनांक. २९/१२/२०२० रोजी बोईसर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. ३२०/२०२० भादविसं कलम ४५४,४५७,३८०,३४ प्रमाणे गुन्हा दाखल केला.सदर गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन श्री. दत्तात्रय शिंदे पोलीस अधीक्षक पालघर यांनी पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे ४ वेगवेगळे पथक तयार करण्याचे आदेश दिले. त्याप्रमाणे पोलीस उप निरीक्षक आशिष पाटील स्थानिक गुन्हे शाखा बोईसर पोलीस उपनिरीक्षक. योगेश कोंडे बोईसर पोलीस ठाणे, पोलीस उपनिरीक्षक संदीप पाटील बोईसर पोलीस ठाणे, सहाय्यक पोलीस निरीक्षक श्री.गीताराम शेवाळे मुख्यालय असे चार पथक तयार करून झारखंड राज्यात पाठविण्यात आले. सदर पथकाने गुप्त बातमीदार मार्फत माहिती काढली.मिळालेल्या माहितीच्या आधारे आरोपी बदरुद्दीन कादीर शेख व हासिम फैजुद्दीन शेख राहायला ता. राजमहाल जि. साहिबगंज राज्य- झारखंड यांना ताब्यात घेतले त्यांच्याकडे सखोल चौकशी करून आरोपी हे सदरच्या गुन्ह्यांमध्ये सहभाग असल्याची कबुली दिली. आरोपी यांच्या ताब्यातून ३२४.८००ग्रॅम सोने (१४लाख रुपये) व ५,५०,०००/- रुपये रोख रक्कम असा एकूण १९,५०,०००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गुन्ह्यातील उर्वरित आरोपी यांचा शोध घेण्याकरिता १) सहाय्यक पोलीस निरीक्षक. श्री. प्रदीप पाटील वाडा, पोलीस ठाणे २)सहाय्यक पोलीस निरीक्षक.श्री.गजानन पडाळकर पालघर पोलीस ठाणे ३) सहाय्यक पोलीस निरीक्षक.श्री.विलास जाधव, तलासरी पोलीस ठाणे ४) पोलीस उपनिरीक्षक. अल्पेश विशे वाणगांव पोलीस ठाणे ५)पोलीस उपनिरीक्षक.अजित कणसे, मनोर पोलीस ठाणे ६) पोलीस उपनिरीक्षक अरुण भिसे, बोईसर पोलीस ठाणे असे ६ पथक तयार करून झारखंड व पश्चिम बंगाल येथे रवाना करण्यात आले होते. सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री. प्रदीप कसबे, बोईसर पोलीस ठाणे हे करीत आहे.सदरची कामगिरी श्री दत्तात्रय शिंदे पोलीस अधीक्षक, पालघर, यांच्या सूचनेप्रमाणे श्री.प्रकाश गायकवाड, अपर पोलीस अधीक्षक, पालघर, श्री विश्वास वळवी, उपविभागीय पोलीस अधिकारी, बोईसर विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस अधिकारी व पोलीस कर्मचारी तसेच पथक यांनी केली.

हे साप्ताहिक मालक, मुद्रक, प्रकाशक - दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमानी प्रिंटिंग प्रेस, गाला नं. 4, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीय इस्टेटच्या बाजूला, गेट नं. 2, गोरेगांव (पूर्व), मुंबई - 400 063 येथे छापून 2, राजाराम को. ऑ.हौ.सो. बंदरवाडी, नवघर रोड, शनी मंदिरा जवळ, भाईंदर (पूर्व), ठाणे - 401 105 येथे प्रकाशित केले. या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (सर्व वाद ठाणे न्यायालयाच्या कक्षेत). संपर्कः-9594418181 / 8424989898